अपील अधिकारी तथा सामान्य प्रशासन विभाग
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org
अपील क्र.६८/२०२३

जा.क्र उआ (सा.प्र.)/ आस्था/ ६७७५ दि. ०५/०९/२०२३

अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त , सामान्य प्रशासन विभाग, पुणे महानगरपालिका
अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/६८/२०२३

प्रति,

श्री.श्रीनाथ चव्हाण
५६ तळजाईमाता वसाहत पद्मावती
सहकारनगर क्र.१, उकिरंडे रेशनिंग दुकानाजवळ
पुणे-४११००९

यांस

---------------- अपिलार्थी

विरुद्ध

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी**
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

श्री.श्रीनाथ चव्हाण, ५६ तळजाईमाता वसाहत पद्मावती, सहकारनगर क्र.१, उकिरंडे रेशनिंग दुकानाजवळ, पुणे-४११००९ (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी आ.क्र.८६४९, दि.२१/०८/२०२३ अन्वये माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्ज प्राप्त झाला आहे.

अपिलार्थी यांचे मूळ अर्जातील माहिती बाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा.क्र.जमाअ/आस्था/४१०७, दि.१७/०७/२०२३ अन्वये अर्जास माहिती दिलेली आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| ७/७/२०२३ | ७/७/२०२३ | ६/८/२०२३ | १७/७/२०२३ | ० |

अपिलार्थी यांनी मागितलेली आवश्यक माहिती न देता चुकीची माहिती देण्यात आली तसेच माहिती देण्यात टाळाटाळ होत असल्याने अपिल सुनावणी घेणेकामी दि.२१/८/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| २१/८/२०२३ | २१/८/२०२३ | ६/९/२०२३ | होय | -- |

अपिल दिनांक ०१/०९/२०२३ रोजी सकाळी ११.३० वा. सुनावणी आयोजित करण्यात आली होती. अपिलार्थी यांना दूरध्वनीवरुन सुनावणीस उपस्थित राहणेबाबत दि.३१/८/२०२३ रोजी दुपारी ३.०० वा.कळविण्यात आले होते. सुनावणीस अपिलार्थी श्री.श्रीनाथ चव्हाण व जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी ,आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते.

## विवेचन

अपिलार्थी यांनी "४४२ पानांचे एकूण ८८४/- भरणेबाबत दि.१७/७/२०२३ रोजीचे पत्रानुसार कळविण्यात आले त्यानुसार चलनाने पैसे भरुन मूळ अर्जातील विधी विभाग, मुख्य लेखा व वित्त विभाग, झोनिपू यांचे नियंत्रणाखालील खाती वर्ग २ ते ४ या संवर्गातील सेवकांची माहिती मागितली होती. तथापि, सदर विभाग वगळून इतर विभागाची माहिती देण्यात आली. जाणिवपूर्वक मला चुकीची व खोटी माहिती दिली आहे. माहिती देण्याचे टाळटाळ केली असल्याचे", अपिल अर्जात नमूद केले आहे.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग पुणे महानगरपालिका यांनी अर्जास जा.क्र.जमाअ/आस्था/४१७०, दि.१७/७/२०२३ रोजीचे पत्रान्वये दिलेले उत्तर व अपिलार्थी यांचे लेखी म्हणणे पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | मागितलेली माहिती | उपलब्ध माहिती |
|---|---|---|
| | तीन वर्षापेक्षा जास्त सेवा होऊनही बदल्या न झालेल्या सेवकांचे माहितीबाबत सन २००० ते आत्तापर्यंत | |
| १ | पुणे महागनरपालिकेच्या विधी विभाग कार्यालय, मुख्य लेखा व वित्त विभाग कार्यालय आणि उप आयुक्त (झोनिपु) यांचे नियंत्रणाखालील खाती या खात्यात वर्ग २ ते ४ या सवंर्गातील सेवकांच्या तीन वर्षापेक्षा जास्त सेवा एकाच खात्यात होऊनही बदली झालेली नाही अशा सेवकांची नावे व एकाच खात्यात काम करण्याचा कालावधी (दिनांकापासून) याबाबतची माहिती मिळावी. | प्र २- सदरची माहिती निरंक आहे.<br>प्र ३- विधी, मुख्य लेखा व वित्त विभाग व झोनिपु या खात्यात अभियांत्रिकी संवर्गातील ३ वर्षापेक्षा जास्त सेवा एकाच खात्यात काम होवूनही बदली झालेली नाही असे सेवक अभियांत्रिकी संवर्गात नाहीत.<br>प्र ४- अर्जदार यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध होण्याचे दृष्टिने प्र.४ कडून बदलीचे कामकाज केले जात असलेल्या पुणे मनपा आस्थापनेवरील वरिष्ठ लिपीक पदावर कार्यरत असलेल्या ४३० कर्मचाऱ्यांच्या सेवाकार्डची प्रत पाने ४३० देता येतील.<br>प्र ८-अर्जदार यांनी मागणी केलेल्या माहितीकरिता प्रशासन ८ कडून कार्यवाही करण्यात येत असलेल्या कार्यरत लिपीक टंकलेखक पदावरील सेवकांच्या सेवा कार्डच्या प्रती एकूण पाने-१२ देता येतील. |

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देणेसाठी जा.क्र.जमाअ/आस्था/४१०७, दि.१७/७/२०२३ रोजी प्रशासन ४ कडील ४३० पाने व प्रशासन ८ कडील १२ पाने अशी एकूण ४४२ पानांसाठी रक्कम रु.८८४/- अर्जदार यांनी पुणे महानगरपालिका कोष कार्यालयात भरणा केल्यानंतर अर्जदार यांनी मागणी केलेल्या माहितीच्या प्रती उपलब्ध करुन दिल्या जातील, असे नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार चलन क्र. १८५३६० दि.२०/७/२०२३ रोजी रक्कम रु.८८४/- भरणा केला आहे. वर्ग २ ते ३ ची सर्व सेवकांची माहिती प्राप्त आहे, मात्र विधी विभाग, मुख्य लेखा व वित्त विभाग, उप आयुक्त (झोनिपु) यांचे नियंत्रणाखालील खात्यांमधील आपेक्षित सेवकांची माहिती त्यामध्ये नसल्याचे अपिलार्थी यांनी नमूद केले. नुकत्याच बदल्या झाल्यामुळे सेवाकार्डातील नोंदी अपूर्ण आहेत तसेच ३ वर्षापेक्षा जास्त सेवा होवून बदली न झालेले सेवक सदर खात्यामध्ये नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले. वर्ग ४ मधील सेवकांच्या बदल्या होत नसल्याने संबंधित सेवक त्याच खात्यात कार्यरत असतात. सेवा काळातील नोंदी अद्ययावत करुन माहिती अधिकारामध्ये उत्तर देताना संबंधितांना स्पष्ट उत्तर देण्यात यावे. वर्ग २ ते ४ मधील ज्या सेवकांची माहिती अपिलार्थीस अपेक्षित आहे, त्यांची नावे लेखी स्वरुपात यादी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे सादर करावी, त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी पुरवावी. सदर विवेचनाअंती पुढील प्रमाणे आदेश पारित करणेत येत आहे.

## आदेश

अपिलार्थी यांनी त्यांना आवश्यक असलेल्या सेवकांची यादी लेखी स्वरुपात जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांचेकडे द्यावी. जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी यांनी त्यानुसार माहिती तयार करुन अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. त्यानुसार, सदर अपिल क्र.६८/२०२३ निकाली काढण्यात येत आहे.

५/९/२३

(सचिन इथापे)
अपिलीय प्राधिकारी तथा
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका

---

सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे-१ यांचेकडे व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतुद आहे.

सदर निकालाची प्रत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**प्रत/-**

जन माहिती अधिकारी,
आस्थापना विभाग,
पुणे महानगरपालिका.